मनाची शांती सर्वांत मोठं धन आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २२ मे २०२५ | अंक १५९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी

## मुख्यमंत्री फडणवीसांनी घेतला मोठा निर्णय



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर महत्त्वाची पत्रकार परिषद पार पडली, या पत्रकार परिषदेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि मंत्री गिरीश महाजन यांची देखील उपस्थिती होती. या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. अनेकदा शेतकऱ्यांना पीक कर्जाचं वाटप करताना बँकांकडून सिबील स्कोअर तपासला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज मिळत नाही, पैसे नसल्यानं ऐन पेरणीच्या हंगामाममध्ये शेतकरी अडचणीत सापडतो. या संदर्भात आता सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना कर्ज देताना सिबील स्कोअची मागणी होणार नाही, शेतकऱ्यांकडे सिबील स्कोअर मागणाऱ्यांवर कारवाई करणार असं फडणवीस यांनी म्हटलं आहे. आज राज्याची खरीप हंगामाची बैठक झाली. या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री आणि विविध जिल्ह्यांचे पालकमंत्री उपस्थित होते. या वर्षी सरासरी पेक्षा अधिक पावसाचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये सरासरीपेक्षा सात टक्क्यांपासून ते सतरा टक्क्यांपर्यंत अधिक पाऊस होण्याची शक्यता आहे.राज्यात आवश्यक तेवढा बियाण्यांचा पुरवठा आहे, आवश्यक तेवढं खत उपलब्ध आहे. बियाणं आणि खतांचा कुठलाही तुटवडा राज्यात निर्माण होणार नाही. या काळात वारंवार बोगस बियाण्यांचे प्रकार समोर येतात म्हणून महाराष्ट्रानं पहिल्यांदाच एक प्रयोग केला आहे, केंद्र सरकारचं साथी हे एक पोर्टल आहे. या पोर्टलवर जे काही बियाणं आहे त्यांचं रजिस्ट्रेशन करावं लागतं. त्यामुळे या बियाण्याचं उत्पादन नेमकं कुठे झालं आहे, हे आपल्याला या माध्यमातून ट्रेस करता येतं. यामुळे बोगस बियाणं आपल्याला पूर्णपणे रोखता येणार आहे,

# बीड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदासाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्तीबाबत

बीड, दि. 19 :- जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचे कार्यालयासाठी “जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी” हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात 11 महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यासाठी जाहिरात व विहीत केलेला अर्जाचा नमूना या कार्यालयाचे वेबसाईट www.beed.nic.in वर दि.21.05.2025 रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

“जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी” या कंत्राटी पदासाठी उमेदवाराने आपला विहीत नमून्यातील अर्ज A-4 साईजच्या पांढऱ्या कागदावर टंकलिखित - हस्तलिखित करुन मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड-431122 या पत्यावर दिनांक 23 मे, 2025 रोजीपासून ते दि. 05 जून, 2025 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत विहीत नमून्यात अर्ज पोहोचेल अशा रितीने पोस्टाद्वारे किंवा आवक जावक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे समक्ष सादर करावेत. या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) प्राप्त झालेल्या विहीत नमुन्यातील अर्जाचा विचार करण्यात येईल. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

“जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी” या कंत्राटी पदासाठी शैक्षणिक अर्हता मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी, पदव्युत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन) अशी आहे. तसेच प्राप्त अर्जांच्या छाननीनंतर भरती प्रक्रियेसंदर्भात पुढील माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळ www.beed.nic.in वर प्रसिद्ध करण्यात येईल.

“जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी” हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात 11 महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यासाठीची संपूर्ण भरती प्रक्रिया जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पार पाडली जाणार आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे.

# जाधववाडी येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती साजरी...

## 10 वी 12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा केला सत्कार..

बीड प्रतिनिधी:-बीड तालुक्यातील जाधववाडी येथे दिनांक 19 मे 2025 रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली, विविध क्षेत्रात आपले यश संपादन करणाऱ्या जाधववाडी येथील तरुण आणि ग्रामस्थांच्या वतीने जयंती ही नाचुन नाही तर धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास वाचून केली पाहिजे, असा निर्धार केला त्या निमित्ताने गावातील सर्व नागरिक, महिला मंडळ, तरुण आणि सर्व शिवशंभू भक्त उपस्थीत होते, यात प्रामुख्याने कु. अदिती भाऊसाहेब बरदाडे (12 वी वाणिज्य शाखा) ही बलभीम महाविद्यालयातून पहिली आली तिचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला, 10 वी उत्तीर्ण आणि 12 उत्तीर्ण सर्वच विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, उपस्थीत मान्यवरांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले, श्री भाऊसाहेब बरदाडे, ऋषिकेश उबाळे, यांनी विद्यार्थ्यांस मोलाचे मार्गदर्शन केले, तर श्री जालिंदर जाधव (फौजी) यांनी छ. संभाजी महाराज यांचा जीवन चरित्र व विद्यार्थ्यास विविध क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी मोलाच मार्गदर्शन केल, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगद जाधव यांनी केल.


# रील्स बनवणं जीवावर: सूर्यास्ताचा फोटो घेताना आठव्या मजल्यावरुन पडून मृत्यू

मुंबईच्या दहिसरमध्ये एक काळीज चिरणारी घटना घडली आहे. इयत्ता दहावी पास झाल्याचा आनंद अजून संपलेला नसतानाच एका 16 वर्षीय मुलीचा दुर्देवी मृत्यू झाला आहे. ही मुलगी इमारतीच्या आठव्या मजल्यावरून सूर्यास्ताचे फोटो घेत होती. रिल बनवण्यासाठी फोटो घेत असतानाच तिचा तोल गेला आणि अचानक ती इमारतीच्या खाली पडली. त्यामुळे तिचा जागीच मृत्यू झाला. या दुर्देवी घटनेमुळे तिच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

जान्हवी सावला असं या मुलीचं नाव आहे. ती एका आंतरराष्ट्रीय स्कूलमध्ये शिकत होती. जान्हवी आईवडिलांना एकूलती एक होती. पोलिसांनी या प्रकरणाचा पंचनामा केला आहे. तसेच अपघाती मृत्यू म्हणून केस नोंद केली आहे. जान्हवी घराच्या छतावर एकटीच होती. त्यामुळे तिचा तोल जाऊन मृत्यू झाला असावा, असं पोलिसांनी सांगितलं.

# मराठवाड्यात बोल्ट अरेस्टरफन लावल्याने, वीज कोसळून होणाऱ्या मृत्यूंच्या घटनांत वाढ

मुंबई आणि पुण्यासह महाराष्ट्रात मंगळवारी पावसादरम्यान वीजा कोसळण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे वीज कोसळून मृत्यू होण्याचे संकट वाढले आहे. मध्य महाराष्ट्रातील मराठवाडा क्षेत्रात वीज कोसळून होणाऱ्या मृत्यूंची संख्या मोठी आहे. येथे वीजेचा अटकाव करणारी ‘बोल्ट अरेस्टर’ उपकरणे लावली नसल्याचे उघड झाले आहे. बोल्ट अरेस्टर मुळे वीज त्यास आकर्षित होते आणि



संभाव्य हानी टळते. साल २०२३ मध्ये वीज कोसळून ४८ लोकांचा मृत्यू झाला होता. तर गेल्यावर्षी २८ प्रकरणे वाढली आणि एकूण ७६ लोकांचा मृत्यू झाला. मंगळवारी छत्रपती संभाजीनगरात आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक आपात्कालिन व्यवस्थापन टीमची बैठक झाली यावेळी ही आकडेवारी समोर आली.या संदर्भात आलेल्या अहवालात साल २०२४ च्या मान्सून पूर्व बैठक झाली. तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठवाड्यातील आठ जिल्ह्यात किमान १०० बोल्ट अरेस्टर उपकरणे बसविण्याचे आदेश दिले.परंतू एकाही जिल्ह्याने या उपकरणाच्या खरेदीसाठी प्रस्ताव पाठवला नाही. मराठवाड्यात एकूण ४०३ बोल्ट अरेस्टर परभणीत चार उपकरणे आहेत, मात्र सर्व खराब झाली आहेत. परभणीत २०२४ मध्ये १० लोक ठार झाले होते. मराठवाड्यात एकूण ४०३ बोल्ट अरेस्टर उपकरणे बसवली आहेत. अनुक्रमे छत्रपती संभाजीनगरात ७५, जालना ३, परभणी ४,हिंगोलीत २, नांदेडात ४, बीडमध्ये ३०८, लातूरात ३ आणि धाराशिवमध्ये ४ बोल्ट अरेस्टर बसवले आहेत.

# राज्यात अनेक ठिकाणी पावसाचा जोर, महाराष्ट्रात पुढील दोन दिवस जोरदार पाऊस कोसळणार, मे महिन्यात का पडत आहे पाऊस?

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मे महिन्यात जोरदार पाऊस सुरु आहे. मुंबई, पुण्यासह विदर्भ, मराठवाड्यात अनेक भागांत बुधवारी रात्री पाऊस झाला. गुरुवारी सकाळीसुद्धा पावसाळी वातावरण आहे. राज्यात पावसाचा जोर २४ मे पर्यंत कायम असणार आहे, असा अंदाज पुणे हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे. पुढील दोन दिवसांमध्ये दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि पुणे जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता असल्याचे हवामान विभागाचे शास्त्रज्ञ जालिंदर साब यांनी व्यक्त केली. अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. राज्यात यंदा मे महिन्यात उन्हाचे चटके बसण्याऐवजी पावसाळ्याचा अनुभव नागरिकांना येत आहे. मागील काही दिवसांपासून प्री-मान्सून पावसाला सुरुवात झाली आहे. सध्या हा पाऊस वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह होत आहे. वाऱ्याचा वेग ताशी ५० ते ६० किलोमीटरपर्यंत असण्याची शक्यता आहे. काही भागांमध्ये हा पाऊस जोरदार ते अतिजोरदार स्वरूपाचा असण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. मे महिन्यात का पडत आहे पाऊस गोवा तसेच लगतच्या कर्नाटक किनारपट्टीला समांतर अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. यामुळे महाराष्ट्रात पाऊस पडत आहे. मे महिन्यात राज्यात इतका जोरदार पाऊस अत्यंत दुर्मिळ आहे. यंदा मान्सून अंदामान-निकोबारमध्ये लवकर सक्रीय झाला आहे. महाराष्ट्रात जूनच्या सुरुवातीलाच प्री-मान्सून दिसतो. पण यावर्षी वातावरणातील बदलांमुळे प्री-मान्सून पावसाला लवकर सुरुवात झाली आहे. विदर्भ, मराठवाड्यात पाऊस विदर्भ, मराठवाड्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाचा धुमाकूळ सुरू आहे. गेल्या दोन



दिवसांत अनेक भागांत मुसळधार पाऊस सुरू आहे. बुधवारी रात्री धारशिवमध्ये संततधार पाऊस बरसला. अमरावती शहरासह संपूर्ण जिल्हाभरात पावसाने बुधवारी रात्री दमदार बॅटिंग केली. या पावसामुळे अनेक भागांत पाणी साचल्यामुळे अमरावती महानगरपालिकेच्या पावसाळी कामांची पोलखोल झाली. पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. बीडमध्ये शेतकऱ्यांच्या शेतात कांदे सडले आहेत. पुणे, मुंबईत पाऊस मुंबई, पुण्यात बुधवारी रात्री पाऊस झाला. पुणे शहरात मुसळधार पावसामुळे ५४ ठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. अग्निशामक दलाच्या जवानांनी तातडीने मदतकार्य करून रस्त्यात पडलेल्या फांद्या, झाडे हटवून रस्ते वाहतुकीस खुले करून दिले. मुंबई उपनगरातील कांदिवली, बोरिवली, मालाड, दहिसर, गोरेगाव आणि अंधेरी भागात मेघगर्जनेसह पाऊस झाला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २२ मे २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### माननीय IPS बिरदेव सिध्दाप्पा डोणे यांचा प्रेरणादायी प्रवास.

नुकताच यूपीएससी सिव्हिल परीक्षेचा निकाल लागला,अन् घरोघरात पोहचले बिरदेव सर.ही कमाल कशाची तर एका जिद्दीची,कष्टाची,मेहनतीची. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वाक्य शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे,ते प्राशन करणारा गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.काय अन्याय होतो,हे कोणाला समजते ज्याला काही तरी ज्ञान आहे.पण,बिरदेव सरांची यश वाट अतिशय खडतर येते... आणि या वाटेवर पदोपदी मदत करणारे मित्र होते,प्राचार्य होते हे अधिक महत्त्वाचे.शिक्षणासाठी प्रत्येकाने एकमेकांना मदत केलीच पाहिजे.

देशभरातून लाखो विद्यार्थी या स्पर्धा परीक्षा देतात.काहींना यश लाभते तरी काहींचे थोड्या थोड्या गुणांनी हुलकावणी देते. चिकाटी,जिद्द,मेहनत, कष्ट या शिवाय पर्याय नाही.यात या ही वर्षी कोणी IPS,IAS,IRSA झाले,यातून भारताला नव्या अधिकाऱ्यांचे पथक मिळाले. प्रत्येकाला त्यांच्या त्यांच्या( गुणवत्तेनुसार) गुणांनुसार पदे ती ती मिळाली.

यातच बिरदेव डोणे यांनी ५५१ वी रँकने IPS पद मिळविले.ही गरुड झेप खूप प्रेरणादायी आहे.त्यांचे कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील येमगे हे गाव.एका मेंढपाळाचा मुलगा इतकी मोठी मजल मारू शकतो...ही गोष्ट सर्वांसाठी प्रेरणादायक. परिस्थितीवर मात करत,मेहनतीने पुढे जाणे,थांबला तो संपला.. या नीतीने आपले कार्य करायचे.ज्याच्याकडे पैसा तेच विद्यार्थी असे यश संपादन करू शकतात हा गैरसमज धुतला/ खोडला जाईल.

परीक्षेचा निकाल लागला तेव्हा अस्सल मातीतील मुलगा त्याच मातीत कष्ट करत होता.कोणत्याही कामाची कधी लाज वाटू द्यायची नाही. वडिल आजारी,त्यांचे किडनी चे ऑपरेशन झाले म्हणून थोडी हवा पालट व्हावी म्हणून आई वडिलांना घेवून मामा जेथे त्यांच्या व डोणे कुटुंबाच्या ही मेंढ्या जेथे राखतात ते ठिकाण म्हणजे कर्नाटक राज्यातील बेळगाव जवळील एक माळरान तेथे येवुन राहतात.मामा बरोबर मेंढ्या घेवून जातात,जेणेकरून वडिलांना मेंढीचे,शेळीचे दूध देता येईल या उद्देशाने.

त्यांचे वडील जुनी १० वी पास, आर्मी मध्ये शिपाई साठी भरपूर प्रयत्न केले पण,नेहमी त्यांना अपयश आले आणि शेवटी वयोमर्यादा ही संपली म्हणून पुन्हा ते मेंढी राखण्याचा व्यवसाय करू लागले.१ ली ते ७ वी चे शिक्षण प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत झाले तर ८ वी ते १० वी चे शिक्षण जय महाराष्ट्र विद्यालयात झाले.सुरुवातीपासून शाळेत खूप हुशार होते..नेहमी वर्गात पहिला,दुसरा नंबर असायचा.५ वी मध्ये नवोदय परीक्षेत नंबर लागला नाही म्हणून खूप नाराज झाले कारण शिक्षकांना ही वाटत होते..नंबर नक्की लागेल..कारण अभ्यास खूप चांगला होता.नंतर ८ वी मध्ये NMS ची परीक्षा दिली व ती पास झालो... रँक मुळे सलग चार वर्षे ६०००रुपये मिळणार होते त्याचा अधिक आनंद झाला.कारण परिस्थिती अतिशय नाजूक होती.सुट्ट्या मध्ये मेंढ्या चारत असत..म्हणून शिक्षकांनी घरच्यांना सांगितले होते त्याला अभ्यास करू द्या.नंतर वडिलांनी सर्व मेंढ्या,शेळ्या मामाला सांभाळायला दिल्यात व स्वतः शेती करू लागले तर आई मोल मजुरी करू लागली.परिस्थिती जेम तेम अन् त्यात आमचे शिक्षण.१० वी मध्ये ९६% गुण मिळाले. गणितात १०० पैकी १०० गुण मिळाले. तेव्हा शाळेत राजेंद्र दराडे सरांचे शाळेला अभिनंदन चे पत्र आले..खूप आनंद झाला..त्याची रंगीत झेरॉक्स फक्त माझ्याकडे आहे..ओरिजनल शाळेत आहे.खूप सत्कार,समारंभ झाले. कोणी सत्कार करावा अशी बिल्कुल अपेक्षा नव्हती..अपेक्षा होती पुढील शिक्षणासाठी कोणी तरी मदत करावी.खूप लोकांनी आश्र्वासन दिली.पण ,कोणी ते पाळले नाही.दोन्ही हात मदतीला यावे असे वाटत होते पण तसे झाले नाही.ज्युनियर कॉलेज साठी कोह्लापूरच्या ट्रस्ट ने दत्तक घेतले आणि त्यांनी माझ्या २ वर्षाची जबाबदारी घेतली.घरापासून २-३ किमी.अंतरावरील कॉलेज मध्ये सायकल वर कॉलेज मध्ये जावू लागलो. Bio मध्ये जास्त आवड नव्हती त्यामुळे bio विषय सोडला.१२ वीत CET मध्ये १६२ गुण मिळाले.पुण्यात COP Engering college मध्ये प्रवेश घेतला..सिव्हील मध्ये.कमवा शिका योजने अंतर्गत मी शिक्षण घेत होतो,१-२ शिष्यवृत्ती ही मिळाल्यात आणि राजेंद्र हजारे सरांनी एज्युकेशन लोन ही काढून दिले.कारण खर्च खूप होता.शासकीय कॉलेज असून ही खर्च भागविणे मला शक्य नव्हते..आणि घरच्यांना किती त्रास द्यायचा.त्यांचे शिक्षण चालू असताना कॉलेज मध्येच त्यांना प्रेरणा मिळाली नोकरी न करता स्पर्धा परीक्षा द्यायचा.NCERT चे पुस्तकांचा अभ्यास सुरू केला,इंग्रजी सुधारण्याचा प्रयत्न केला,डिक्शनरी घेतली त्याचा अभ्यास सुरू केला.बारामतीचा प्रांजल चोपडे या सिनियर ने माझी तळमळ ओळखली..कॉलेज मध्ये परिस्थितीने,भाषेने,राहणी मान यावरून खूप चिडवायचे पण,त्यात मन स्थिर ठेवण्याचे काम यांनी केले.वासुदेव मोठा भाऊ तो आर्मी मध्ये टेक्निकल डिपार्टमेंट मध्ये लागला..त्यामुळे ते ही पैशाची मदत करत होतेच.नाहीतर तेव्हाच मला नोकरी करावी लागली असती कारण पैशा शिवाय काही काम होत नाही.एप्रिल २०२० मध्ये लॉक डाऊन लागले तेव्हा गावाकडे भारतीय पोस्ट ऑफिस मध्ये पोस्ट मन ची नोकरी करू लागलो.

# आपत्तीचा पावसाळा आजार सर्दी तर होणारच ना...!

पावसाळा आला की पावसाळी छत्र्या येणारच असं मराठीत गंमतीने म्हटलं जातं आणि ते देखील खरच आहे. जंगली मशरूम अर्थात पावसाळी छत्री या आशयाने इथं अर्थ घेतला जात असतो. मात्र येणाऱ्या पावसासोबत ज्या काही गोष्टी समोर येतात त्यात पावसाळ्यात होणारे आजार अर्थात साथरोग देखील येऊ शकतात आणि साथरोगाची ही आपत्ती रोखली नाही तर मोठा गोंधळ निर्माण होतो.

पावसात भिजल्यानंतर सर्दी होणे (common cold) हे अगदी सहाजिक आहे. प्रत्येक वेळी आपण छत्री अथवा रेनकोट घेऊन फिरत नाही आणि अनेकदा वाहनाच्या डिक्कीतला रेनकोट परिधान करेपर्यंत आपण भिजलेलो असतो. लहान बालकांची प्रतिकारशक्ती तुलनेत कमी असली तरी त्यांना याचा धोका कमी आहे. मात्र तथापि दुसऱ्या बाजूस घरातून पालकांकडून याचा प्रसार होऊ शकतो.

साधारणपणे सर्दी-पडसे हा पावसाळ्यातील सवयीचा आजार आहे आणि त्यावर मुख्यतः घरगुती इलाज होताना दिसतात. स्वतःहून औषधे घेणे आणि मुलांना देणे असे प्रकार प्रचलीत आहेत. अनेकदा टि.व्ही. वरील जाहिराती बघुनही औषधे घेतली तसेच दिली जाताना दिसतात परंतु नेमकेपणाने निदान करून मगच औषधे घ्यावीत हे उत्तम.

विविध प्रकारच्या औषधांचा स्वतःहून वापर करणे कुणासाठीही धोकादायकच म्हणावे लागेल कारण या औषधांचे चांगले परिणाम होवून आजारातून बरे होता येईल ही अपेक्षा असते. मात्र या प्रकारच्या औषधांचे दुष्परिणाम काय होतात याची माहिती नसल्याने त्याचा उलटा परिणाम होवू शकतो. आरोग्यासाठी हा धोका पत्करू नये.

आपल्याकडे निष्काळजीपण, दुर्लक्ष करणे आणि दुखणे अंगावर काढणे असेही प्रकार दिसून येतात. यातूनही आजारपण वाढू शकते. त्यामुळे आजारी पडल्यावर न चुकता वैद्यकीय सल्ला घेणं केव्हाही उत्तम.

आपले शरीर मुख्यत्वे पाण्यावर अवलंबून असते. आणि पावसाळ्यात जे आजार आढळून येतात त्यापैकी साधारण 70 टक्के, आजार हे पाण्यामुळे होतात. त्यात पाण्यातील जिवाणुंमुळे होणारे आजार वेगळे आणि विषाणुंमूळे होणारे आजार वेगळे आहेत. या सर्वांचे मुळ अर्थात पाणी हेच आहे.

पावसाळ्यात अनेक विषाणू सक्रिय होतात. त्यामुळे शुद्ध पिण्याचे पाणी हा आजारांना दूर ठेवण्याचा सर्वोत्तम उपाय आहे.



पावसाळ्यात अनेक ठिकाणी जलसाठे दुषित होतात. त्यामुळे आजारांचा धोका वाढत असतो. घरात पिण्याचे पाणी उकळून ते थंड करून घेणे चांगले. पाणी उकळल्याने त्यातील सर्व जिवाणू, विषाणू मरतात. त्यामुळे ज्या ठिकाणी शुद्ध पाणी नाही त्या ठिकाणी पाणी उकळूनच प्यावे.

पाण्यातील अशुध्दपणा दूर करण्याचा आणखी एक उपाय म्हणजे तुरटीचा वापर करणे होय. बाजारात तुरटी सहजरित्या उपलब्ध असते. कोणत्याही किराणा दुकानात ती आपणास खरेदी करता येईल. पाण्यात तुरटी फिरविल्यास गाळ खाली बसेल नंतर त्याचा वापर करता येईल.

पाण्यात तुरटी फिरवणे सर्वच अर्थाने आपल्या आरोग्यासाठी सहाय्यकारी ठरणार आहे. तुरटीच्या पाण्याने अंघोळ केल्यास त्वचेवर होणारा संसर्ग कमी होतो. हे पाणी त्वचेतील मृतपेशी काढून टाकण्यास मदत करते. जखम लवकर भरणे आणि संसर्ग कमी करणे या दोन्हींमध्ये तुरटी लाभदायक आहे.

आला पावसाळा म्हणजे आरोग्य सांभाळा असाच संदेश मानून पावसात भिजण्याचा आनंद घ्यायला देखील हरकत नाही.

**प्रशांत विजया अनंत दैठणकर**
**(जिल्हा माहिती अधिकारी)**
**बीड चलभाषा क्र. 9823199466**

# आकाशात वीज चमकत असताना नागरिकांनी घ्यावयाच्या खबरदारी

बीड, दि. 19 (जि.मा.का.) हंगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्या विविध भागात वीज चमकण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. वीज कोसळणे ही एक गंभीर नैसर्गिक आपत्ती असून नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सर्व नागरिकांना खालील खबरदारीचे उपाय काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

वीज चमकत असल्यास घ्यावयाच्या खबरदारी:

विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर राहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

या गोष्टी करू नका

आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली आंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाईन यांना स्पर्श करू नका. तसेच कुठल्याही विद्युत उपकरणाचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या साह्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडांच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे राहू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारात अथवा खिडकीतून वीज पडताना बाहेर पाहू नका व बाहेर थांबणे तितकेच धोकादायक आहे.

उपयोगी मोबाईल ॲप्सची माहिती,

दामिनी ॲप - हे ॲप भारतीय हवामान विभागाने (IMD) विकसित केले असून विजेच्या गडगडाट आणि संभाव्य ठिकाणांची माहिती नागरिकांना वेळेवर मिळवून देण्याचा उद्देश आहे. हे ॲप आपल्या स्थानाच्या 20 किमी परिसरात वीज कोसळण्याची शक्यता असल्यास तात्काळ अलर्ट पाठवते. वापरण्यास अगदी सोपे असून मराठीसह विविध भाषांमध्ये उपलब्ध आहे. Google Play Store आणि Apple App Store वर हे ॲप मोफत उपलब्ध आहे.

सचेत ॲप – हे ॲप आपत्ती व्यवस्थापन विभागाने विकसित केले असून भूकंप, पूर, वीज चमकणे, वादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या अलर्टस पुरवते. स्थानिक हवामान आणि संभाव्य आपत्तींची अचूक माहिती, सजगता आणि मार्गदर्शन यातून मिळते. या ॲपच्या साह्याने नागरिक वेळेत सुरक्षिततेचे पावले उचलू शकतात. Play Store आणि App Store वर मोफत उपलब्ध आहे.

आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी वरील खबरदारीचे उपाय वेळेवर आणि शिस्तबद्धपणे पाळावेत. प्रशासन आपत्ती व्यवस्थापनासाठी सदैव सज्ज असून नागरिकांनी देखील सजग राहणे गरजेचे आहे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शिवकुमार स्वामी यांनी केले आहे.

*****

# शेतकऱ्यांना बियाणे, खते याचा कुठलाही तुटवडा पडणार नाही- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. 21 : राज्यामध्ये आवश्यक तेवढा बियाण्याचा पुरवठा आणि आवश्यक तेवढे खत उपलब्ध आहे. बियाणे, खते याचा कुठलाही तुटवडा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पडणार नाही. साधारणपणे मागील वर्षांचा कल पाहता कुठले पीक कुठे कमी-अधिक प्रमाणात घेता येईल, याचा विचार करूनच त्या ठिकाणी बियाण्याची उपलब्धता करून देण्यात आलेली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. आज मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे कृषि विभागाच्या राज्यस्तरीय खरीप हंगाम नियोजनाची आढावा बैठक मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या खरीप हंगाम आढावा बैठकीची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. या पत्रकार परिषदेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, कृषी मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे, राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, प्रधान सचिव प्रविण दराडे, प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी तसेच कृषी आयुक्त सुरज मांढरे उपस्थित होते.

**बोगस बियाण्यांवर आळा घालण्यासाठी ‘साथी’ पोर्टल**

मुख्यमंत्री म्हणाले की, बोगस बियाण्यांवर आळा घालण्यासाठी महाराष्ट्राने पहिल्यांदा केंद्र सरकारच्या ‘साथी’ या पोर्टलवर बियाणे नोंदणी करण्याचा नियम केला आहे. या नोंदणीमुळे हे बियाणे ट्रेसेबल होणार आहे. दुर्दैवाने राज्यांमध्ये जे बियाणे विकलं जाते, त्याच्यापैकी 75% बियाणे हे बोगस असून ते उत्पादकांनी तयार केलेले नसते. त्यामुळे या वर्षीपासून हे सर्व प्रकारे बियाणे ‘साथी’ या पोर्टलवर आणायचा निर्णय घेण्यात आला असून त्यास केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. आता जवळपास 70 हजार क्विंटल बियाणे पोर्टलवर उपलब्ध असून ते ट्रेसेबल आहे. त्यामुळे याच्यामध्ये बोगसगिरी झाली तर तर कोणामुळे झाली हे लक्षात येऊ शकणार आहे. पुढच्या वर्षांपासून 100% बियाणे ‘साथी’ या पोर्टलवर असेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**खतांचे लिंकिंग आवश्यक**

खतांच्या बाबतीत लिंकिंगची तक्रार सातत्याने येत असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, लिंकिंग संदर्भात अतिशय कडक अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला आहे. आता प्रत्येक कृषी केंद्राच्या बाहेर लिंकिंगच्या संदर्भातला बोर्ड लावून त्यावर फोन नंबर देण्यात येणार आहे. त्यामुळे लिंकिंगचा कुठे आग्रह झाला तर त्यासंदर्भात त्या नंबरवर फोन केल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, हेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे. एखाद्या कृषी केंद्रांनी पुरवठादार कंपन्याच्या सूचनेवरून लिंकिंग केले नाही, अशा वेळी एसेंशिअल कमोडिटी ॲक्ट किंवा तत्सम कायद्याच्या अंतर्गत त्यांच्यावर कारवाई केली जाईल, अशा इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला.

**किड व्यवस्थापनासाठी डिजिटल शेती शाळा**

कीड व्यवस्थापन योग्य प्रकारे झाले पाहिजे, या दृष्टीने सगळी काळजी घेण्यात येत आहे. विशेषतः यावर्षी डिजिटल शेती शाळा या देखील आयोजित करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक तालुक्यामध्ये डिजिटल शेती शाळा आयोजित करण्यात येणार आहेत. या डिजिटल शेती शाळेच्या माध्यमातून कीड व्यवस्थापनबरोबरच चांगल्या नवीन पद्धतीचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



**शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र - ‘महाविस्तार’ ॲप**

कृषी विभागाने एआय (AI) बेस्ड ‘महाविस्तार’ हे मोबाईल ॲप लॉन्च केले असून या ॲपवर शेतीच्या संदर्भातली सगळी माहिती आणि व्हिडिओज उपलब्ध असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना शेतीतील कुठलाही प्रश्न आला, कुठली लागवड करायची आहे, त्याची काय पद्धती आहे, कुठले कीड व्यवस्थापन करायचे आहे, त्याची काय पद्धती आहे, काय वापरले पाहिजे, कुठल्या स्टेजवर काय वापरले पाहिजे, अशी सगळी माहिती, त्याचे व्हिडिओज त्या ॲपमध्ये असल्याचे त्यांनी सांगितले. या ॲपमध्ये मराठी भाषेत चॅटबॉट असून त्यावर कुठलाही प्रश्न विचारला असता त्याला योग्य उत्तर मिळते. असा हा शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईल डाऊनलोड करून शेतीसंदर्भातील सर्व माहिती मिळवावी, असे आवाहन मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले.

**सिबिल अट नाही**

शेतकऱ्यांना योग्य प्रकारे कर्ज पुरवठा झाला पाहिजे, या संदर्भात बँकांना सांगितले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. एसएलबीसीच्या (SLBC) प्रमुख बँकांनी सिबिलची अट ठेवणार नसल्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे एखाद्या बँक शाखेत जर सिबिलची मागणी करण्यात आली, तर त्या शाखेवर कारवाई करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना वेळेत पतपुरवठा झाला पाहिजे, याकडे आमचे संपूर्ण लक्ष असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सूचित केले.

शेवटी मुख्यमंत्री म्हणाले की, वातावरणातल्या बदलामुळे काही डिझॅस्टरची सूचना आधीच मिळावी यासाठी आयएमडीच्या मदतीने एक डिसिमिनेशनची सिस्टीम देखील तयार केली असल्याचे त्यांनी सांगितले.

## दहावीमध्ये 91% गुण मिळवणाऱ्या साक्षी डोंगरेचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



प्रतिनिधी
अंबड तालुक्यातील कर्जत गावातील साक्षी आण्णासाहेब पा. डोंगरे हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९१% टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संपूर्ण गावामध्ये आनंदाचे वातावरण होते. मंगळवार, दि. २१ मे रोजी ग्रामस्थांच्या वतीने साक्षीचा सत्कार करण्यात आला. प्रगतशील शेतकरी पांडुरंग तात्या डोंगरे, सरपंच संजय भाऊ काळुंके, माजी सरपंच श्रीहरी काका डोंगरे, चेअरमन ज्ञानेश्वर भाऊ डोंगरे, उपसरपंच आण्णासाहेब पा. डोंगरे आणि शालेय व्यवस्थापन समिती कर्जतचे माजी उपाध्यक्ष शिवा डोंगरे यांच्या हस्ते साक्षीचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी साक्षीच्या मेहनतीचे कौतुक करून तिला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. साक्षीने मिळवलेले हे यश कर्जत गावातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून तिच्या पुढील वाटचालीस सर्व ग्रामस्थांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## झाडं पडल्याने घराचे नुकसान...




प्रतिनिधी दि. 20 मे रोजी अंबड शहरात शिवाजी गल्लीत मोठे झाड पडून घर आणि दुकानाचे नुकसान. तसेच विजेच्या तारा वर पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला होता.सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. श्री. राजेंद्र नेमिचंद तुनतुने यांचे दुकान , श्रीमती दिपाली ज्ञानेश्वर खाडरे यांचे घर , श्री. राजु धात्रे यांचे घर श्री. हनुमान गुलाब हतिस्कर यांचे घर, दुकान व गाडी आणि श्री. अमोल वराडे यांच्या घराचा जीना यांचे नुकसान झालेले आहे. सर्व राहणार शिवाजी गल्ली , अंबड नगर परिषद. अंबड नगर परिषदेच्या अग्निशमन विभागाला पाचारण करणेत आले असून पडलेल्या फांद्या काढायचे काम त्यांनी केले.

## बंदिस्त नाली नसल्याने घाण पाणी रस्त्यावर कूपटा ग्रा.पं.च्या वार्ड क्रमांक 4 मधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे आरोप



प्रतिनिधी मानोरा तालुक्यातील लोकसंख्येच्या दृष्टीने मोठी ग्रामपंचायत असलेल्या कुपटा ह्या गावातील अंतर्गत सांडपाणी व्यवस्थापनाचा बोजबरा उडाला असल्याची तक्रार स्थानिकांकडून ग्रामपंचायत प्रशासनाला करण्यात आली असून या गावातील एका वार्डात सिमेंट काँक्रीट ची नाली नसल्याने स्थानिकांना रोगराईचा सामना करावा लागत असल्याची तक्रार आली आहे ७००० च्या जवळपास लोकसंख्या असलेल्या व एकूण चार वार्ड असलेल्या या गावातील सांडपाण्यासाठी आवश्यक असलेल्या नाली बांधकामाचे काम अपूर्ण असल्याचे निवेदन करताना ग्रामपंचायत शासनाला दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे सांडपाणी वाहून येणारी नाली बांधण्यात आल्याने नाल्यातील घाण पाणी कचरा व दुर्गंधी वार्ड क्रमांक चार च्या रस्त्यावरून वाहत असल्याचे हे ग्रामपंचायत प्रशासनाकडून नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचा प्रकार असल्याचे आरोप मंथन मासोतकर यांनी केला आहे अर्धवट राहिलेले बांधकामे व वार्ड क्रमांक चार मधील खोली नाली बांधकाम सुरू करण्यात न आल्यास येथे २५ तारखेला नागरिकांना सोबत घेऊन रस्त्यावर वाहणाऱ्या घाण पाण्यात बसून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे

# बच्चू कडूंनी केली शासन देशाची होळी गुरुकुंज मोझरीत प्रहारचे आंदोलन; घोषणाबाजी करून सरकारचा निषेध

प्रतिनिधी ठकसेन गायकवाड तिवसा: शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आता शिक्षकांच्या प्रश्नासाठी प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू आक्रमक झाले गुरुकुंज मोझरी येथे रविवारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीसमोर शिक्षकांच्या मागणीसाठी आंदोलन करत सरकारच्या आदेशाची होळी केली. यावेळी सरकार विरोधात घोषणाबाजी करून निषेध करण्यात आला.राज्य सरकारने १५ मार्च २०२४ रोजी शालेय शिक्षणसंबंधी काढलेल्या संचमान्यतेचा शासन निर्णय हा जि. प.शाळांचा घात करून ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था मोडकळीस आणणारा आहे.त्यामुळे सरकारने यावर आपली भूमिका स्पष्ट करत हा जीआर तत्काळ रद्द करण्यात आला नाही, तर शालेय शिकाणमंत्र्यांचा दालनात घुसून आंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी बच्चू कडू यांनी दिला.या आंदोलनात प्रहाराचे कार्याध्यक्ष बल्लू भाऊ जवंजाळ,संजय देशमुख,महेश बडे, जितू दुधाने,जय बेलखेडे,मंगेश देशमुख,प्रदीप बंड,योगेश लोखंडे,अंकुश गायकवाड,संतोष किटूकले,राजेश वाटणे,सुरेश गणेशकर यासह शेकडो प्रहारचे पदाधिकारी,कार्यकर्ते सहभागी झाले होते यावेळी तिवसा पोलिसांचा



## रात्रीस खेळ चाले..! दुधना नदीत हायवा व्दारे उपसा थांबेना..प्रशासनाचे दुर्लक्ष
# माफीयांची मुजोरी वाढली, खोलीकरण कामास अडथळा

प्रतिनिधी शनिवार रोजी सकाळी मठपिंपळगाव येथील लोकवर्गणीतून शेतकऱ्यांच्या पुढाकाराने समस्त महाजन ट्रस्ट ,मुंबई यांच्याकडुन मिळालेल्या पोकलेन्ड मशीन चे पूजन करुन खोलीकरणास सुरवात करण्यात आली होती.या नदी खोली करणामुळे बदनापुर,जालना,अंबड तालुक्यातील तीस ते पस्तीस गावाला फायदा होणार आहे. म्हणुन परिसरातील गावातुन लोकवर्गणीतून हे खोली करणाचे काम चालु केले.असे असताना या खोली करणामुळे वाळु माफियांना वाळु चोरी करण्यासाठी अडचणी येत आहे. त्यामुळे वाळु माफीयांनी दुधना नदीचे खोलीकरण चालु असताना रात्री काही परिसरातील वाळु माफीयांनी केलेले खोलीकरण माती टाकुन परत वाळु उपसा साठी रस्ता तयार केला. याची माहिती तहसीलदारांना देऊन देखील काहीच कारवाई होत नाही. कारण वाळु माफीयांशी महसुल विभागाचे अर्थिक संबंध आहे.मग प्रश्न पडतो की




परिसरातील गावकऱ्यांनी दुधना नदीच्या खोलीकरण करुन काय उपयोग.रात्र भर मठपिंपळगाव,गणेशनगर येथुन वाळु उपसा चालु आहे.. हायवा हे जालना तालुक्यातील गणेशनगर हदीतुन जाऊन देण्यासाठी प्रति रात्र दहा हजार रुपये वाळु माफीयांना कडुन संबंधीतांना मिळत आहे. हा उपसा महसुल विभागातील काही लाचखोर अधिकाऱ्यामुळे चालु आहे अशी माहिती आमच्या प्रतिनिधीच्या हाती लागली आहे.तीन - तीन जेसीबी द्वारे वाळु उपसा चालु असताना अंबडचे तहसीलदार यांना हे दिसत नाही का? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

## पत्रकार उत्कर्ष समितीचे पुढील उपक्रम अधिकाधिक व्यापक व्हावेत..!
# - मनोज सानप ठाणे जिल्हा माहिती अधिकारी

पनवेल/प्रतिनिधी- गुरुनाथ तिरपणकरडॉ. अशोक म्हात्रे यांचे कार्य खूपच कौतुकास्पद असून पत्रकार उत्कर्ष समितीचे पुढील उपक्रम अधिकाधिक व्यापक व्हावेत. पत्रकार उत्कर्ष समितीचे अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे यांनी काल ठाणे जिल्हा माहिती कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी आपले मत व्यक्त केले. यावेळी पत्रकार



उत्कर्ष समितीचे अध्यक्ष डॉ.अशोक म्हात्रे यांनी जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांना शाल व सन्मान चिन्ह भेट दिले.समितीचे अध्यक्ष डॉ.अशोक म्हात्रे यांनी पत्रकार उत्कर्ष समितीच्या विविध कार्याची माहिती जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांना दिली. माध्यमाचे बदलते स्वरूप बदलत्या काळात नवनवीन माध्यमांचा उपयोग याबद्दल सखोल मार्गदर्शन जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी यावेळी केले. पत्रकार उत्कर्ष समितीच्या अंतर्गत करण्यात येत असलेल्या उपक्रमाचे मनोज सानप यांनी कौतुक केले पुढील उपक्रम अधिकाधिक व्यापक व्हावेत, डॉ. अशोक म्हात्रे यांचे कार्य खूपच कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी पत्रकार उत्कर्ष समितीचे सचिव डॉ.वैभव पाटील, खजिनदार श्री. शैलेश ठाकूर, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष श्री. सुधीर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# गणेश म्हणजे गणराया,हिरवे म्हणजे हिरवेगार सौंदर्य,जॉय म्हणजे आनंद

जॉय ऑफ गिविंग या सामाजिक संस्थेचा दशकपुर्ती सोहळा उत्साहात संपन्न होत आहे प्रथम जॉय चे अभिनंदन व खुप खुप शुभेच्छा!गणेश हिरवे सर आणि आमची मैत्री संस्था स्थापन होण्यापुर्वीची आहे.गणेश सर म्हणजे शिक्षक,पालक,सामाजिक बांधिलकी असे सर्व गुण संपन्न चतुरस्त्र व्यक्तीमत्व.जॉयचे कौतुक करावे तेवढे



कमीच.या संस्थेने गेल्या दहा वर्षात महाराष्ट्राच्या विविध भागात शैक्षणिक ,सांस्कृतिक,प्रबोधन,सामाजिक अशा विविध क्षेत्रात समाजविभुमक उपक्रम राबवुन जॉयचे नाव उच्च स्थरावर नेऊन ठेवले आहे.मलाही त्यांच्या उपक्रमात सहभागी होता आल हे माझे भाग्य!संस्थेचे कार्य यशस्वी होण्यासाठी संस्थेमध्ये कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांची मांदीयाळी,उच्च शिक्षित पदाधिकारी व सर्वतोपरी झटणारे हरहुन्नरी कार्यकर्ते ही संस्थेची उल्लेखनीय बाब आहे. जॉय ऑफ गिविंग चा हा वटवृक्ष असाच बहरत राहो,आपल्या पुढील सामाजिक कार्यास व संस्थेच्या पुढील वाटचालीस तसेच दशकपुर्ती सोहळ्यास मनःपूर्वक शुभेच्छा !!!

# युट्यूबर ज्योती मल्होत्राच्या प्रकरणानंतर सरकार अलर्ट मोडवर; युट्यूबर्ससाठी आता कडक नियम

युट्यूबर ज्योती मह्लोत्राच्या अटकेनंतर सरकार अलर्ट मोडवर आलं आहे. यामुळे आता युट्यूबर्स आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसरसाठी सरकारकडून आता कडक नियम करण्यात आले आहेत. ट्रॅव्हल ब्लॉगर्सनी तयार केलेल्या कंटेंटसाठी कडक नियम असणार आहेत. हरियाणा सरकार एक नवीन कारवाई करण्याच्या तयारीत आहे. युट्यूबर्स आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसरसाठी सरकारकडून नवीन मार्गदर्शक तत्त्वे तयार केली जाऊ शकतात. ट्रॅव्हल ब्लॉगर्सनी तयार केलेल्या कंटेंटसाठी कडक नियम असतील.

युट्यूबर्स आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसरसाठी कडक कायदे तयार होणार खरं तर, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सैनी यांनी त्यांच्या गृह विभागाच्या एका अधिकाऱ्याला या संदर्भात कडक सूचना दिल्या आहेत. यासोबतच, त्यांना मानक कार्यप्रणाली (SOPs) चा मसुदा तयार करण्यास सांगण्यात आले आहे. माहितीनुसार, त्यात अनेक विभागांचे समन्वय देखील समाविष्ट असेल,



ज्यामध्ये गृह विभाग, आयटी विभाग इत्यादींचा समावेश असेल. त्यामुळे आता ज्योती मह्लोत्राच्या प्रकरणानंतर भारतातील युट्यूबर्स आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसरसाठी नक्कीच काही कडक कायदे आणि नियम तयार होण्याची शक्यता आहे. आणि ते नियम काय असतील याची माहिती सरकार देईलच.

मुख्यमंत्र्यांशी भेट हरियाणाच्या गृहसचिव सुमिता मिश्रा यांनी सांगितले की, मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली एक आढावा बैठक झाली. यावेळी कायदा आणि सुव्यवस्थेवर चर्चा झाली. तसेच, जिल्ह्यातील एसएसपी, सीपी आणि डीसी यांच्यात समन्वयावर भर देण्यात आला. मुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीत पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याचा आरोप असलेल्या ज्योती मह्लोत्राबद्दलही चर्चा

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
https://lokaarambh.com

# भारताने पाकिस्तानवर मिसाईल डागले त्या रात्री रशियाचे राष्ट्रपती का घाबरले?

भारताने पाकिस्तानवर हल्ला केल्यानंतर अख्खा जगाला चिंतेने घेरलं होतं. अनेक देशांनी हे युद्ध होऊ नये म्हणून देव पाण्यात घातले होते. त्याच रात्री यूक्रेन आणि रशियानेही एकमेकांवर ड्रोन हल्ले केले होते. त्यामुळे रशिया सारख्या बलाढ्य देशाचे राष्ट्रपती ब्लादिमीर पुतीन सुद्धा त्या रात्री घाबरले होते. या सर्व घडामोडींमुळे पुतीन यांना मोठा धक्का बसला होता. अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी फोनवर चर्चा करताना पुतीन यांनी हा किस्सा शेअर केला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी फोनवर झालेल्या चर्चेवेळी व्लादिमीर पुतीन यांनी मनातील गोष्ट बोलून दाखवली होती. मी गेल्या तीन वर्षात पहिल्यांदाच 7 मे रोजीच्या रात्री थोडा घाबरलो होतो, असं पुतीन यांनी ट्रम्प यांना म्हटलंय. पुतीन यांनी जी तारीख ट्रम्प यांना सांगितली, त्याच तारखेला भारताने पाकिस्तानवर एअर स्ट्राईक केला होता. भारताच्या या स्ट्राईकमध्ये पाकिस्तानातील 100हून अधिक अतिरेकी मारले गेले होते. तसेच पाकिस्तानातील अतिरेक्यांची 9 ठिकाणेही नेस्तनाबूत करण्यात आली होती. पुतीन नेमकं काय म्हणाले? तास समाचार एजन्सीच्या वृत्तानुसार, सीजफायरमध्येही यूक्रेनने मॉस्कोवर ड्रोनने हल्ले केले होते. हा हल्ला 7 मे रोजी रात्री झाला होता. यूक्रेनने रशियावर त्या रात्री सुमारे



564 ड्रोन डागले होते. चीन आणि इतर देशांच्या मोठ्या राष्ट्राध्यक्षांांना मॉस्को येऊ द्यायचे नाही हा यूक्रेनचा डाव होता. पण आम्ही ड्रोन हल्ले संपुष्टात आणण्यासाठी तात्काळ अनेक प्रयत्न केले, असं पुतीन यांनी ट्रम्प यांना सांगितलं. त्या रात्री मी थोडा घाबरलो होतो. मला वाटलं यूक्रेनच्या भीतीने चीन आणि जगातील लोक यूक्रेनला घाबरतील. त्याचा थेट परिणाम मॉस्कोच्या व्हिक्ट्री परेडवर पडेल, असं पुतीन म्हणाले होते. 9 मे रोजी मॉस्कोत व्हिक्ट्री परेडचं आयोजन करण्यात आलं होतं. चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग या कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे होते. जिनपिंग यांच्यासह या परेडमध्ये जगातील इतर देशाच्या पाहुण्यांनाही बोलावण्यात आलं होतं. त्याच रात्री भारताची स्ट्राईक 22 एप्रिल रोजी पहलगाममध्ये लश्कर ए तोयबा समर्थित द रेजिडेंट फ्रंट्च्या दहशतवाद्यांनी हल्ला करून 26 नागरिकांना ठार मारलं होतं. त्यानंतर भारताने पाकिस्तानातील दहशतवादी ठिकाण्यांना लक्ष्य केलं होतं. 7 मे रोजी रात्री भारताने लष्कर, जैश आणि हिज्बुलच्या 9 ठिकाण्यांवर एअर स्ट्राईक केली होती. या स्ट्राईकमध्ये पाकिस्तानचे 100 हून अधिक दहशतवादी मारले गेले होते. या घटनेनंतर भारत आणि पाकिस्तानच्या दरम्यान मोठं युद्ध होण्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे जगाला या युद्धाचं टेन्शन आलं होतं. पाकिस्तानच्या सैन्याने दहशतवाद्यांचा ढाली सारखा वापर केला.

## आश्वी खुर्दच्या कर्मवीर भाऊराव पा.विद्यानिकेतन मधे कर्मचा-यांचा सेवापूर्ती कृतज्ञता सोहळा संपन्न

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी आश्वी खुर्द ता संगमनेर येथील लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पा ( पद्मभूषन उपाधिने सन्मानीत ) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यानिकेतन व कनिष्ठ महाविद्यालयात उपमुख्यध्यापीका सौ. अलका तांबे मॅडम , राज्यस्तरीय आदर्श ग्रंथपाल पुरस्कार प्राप्त श्री.उल्हास देव्हारे सर ,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपशिक्षक श्री. राजेंद्र चौधरी सर , माध्यमीकचे उपशिक्षक श्री. अनिलकुमार डांगे सर , विज्ञान परिचर श्री. बाळासाहेब वाबळे यांचा सेवापूर्ती कृतज्ञता सोहळा उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समितीचे अध्यक्ष श्री. आण्णासाहेब भोसले पाटील होते. , तर प्रमुख अतीथी संस्थेच्या शिक्षण संचालिका सौ. लिलावती सरोदे मॅडम व संचालक डॉ.प्रदिप दिघे सर सर उपस्थीत होते, प्रथम अतीथी व सेवानिवृत्त होणा-या सेवकांच्या हस्ते पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पा. व पद्मभूषन डॉ. बाळासाहेब विखे पा. यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन केले, त्यानंतर प्रमुख अतीथींच्या शुभहस्ते सेवानिवृत्त कर्मचा-यांचा सत्कार करुन, सन्मानपत्र देउन गौरविण्यात आले "नियत वयोमानानुसार कर्मचारी सेवानिवृत्त होत असतातच, त्याच प्रमाणे आश्वी खुर्दच्या या शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांमुळे आजपर्यंत अनेक विद्यार्थी चांगल्या पदावर पोहचले, ग्रंथपाल देव्हारे सरांनी 'जॉय ऑफ गिव्हिग' या मुंबई येथील सामाजीक संस्थेचा २०२५ चा , पारस व संवर्धिनी या संस्थांचे "राज्यस्तरीय आदर्श ग्रंथपाल पुरस्कार" मिळवुन संस्थेच्या व शाळेच्या नाव लौकीकात नेहमीच भर टाकली आहे, या पुढील त्यांचे आयुष्य आनंदी ,सुख समृद्धीचे व आरोग्यदायी जाओ हि साईचरणी



प्रार्थना करते " असे मनोगत शिक्षण संचालिका सौ. सरोदे मॅडम यांनी व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्तवीक प्राचार्य श्री. सयराम शेळके सरांनी करून सर्वाचे स्वागत केले , पर्यवेक्षिका सौ.माधुरी सातपुते मॅडम यांनी सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या कार्याची माहिति दिली. सेवानिवृत्त होणा-या उपमुख्यध्यापीका सौ तांबे मॅडम , चौधरी सर , देव्हारे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करुन कृतज्ञता व्यक्त केली व सर्वाचे आभार मानले, सेवनिवृत्त कर्मचा-यांनी सी.ई.टी. पुस्तकांचा संच विद्यालयास संप्रेम भेट दिला. या कार्यक्रमास सरपंच सौ.अलका गायकवाड , बापुसाहेब गायकवाड पा , विठ्ठल वर्पे सर,डॉ.दिनकर गायकवाड पा, मनीषा लुनीया ,डॉ. बाळासाहेब आंधळे , संपत कुटे सर, मुस्ताक शेख सर, डॉ. आण्णासाहेब तांबे सर, शंकर गाडेकर आदि ग्रामस्त,शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थीत होते

## सिंधुचा पाणी प्रश्न पेटला, भारताने पाणी रोखल्याने पाकिस्तानमध्ये पाणीबाणी

भारताने पहलगाम हल्ल्यानंतर सिंधु नदीचे पाणी अडवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचे पडसाद आता पाकिस्तानमध्ये दिसत आहे. येथील पाण्याचा प्रश्न भीषण झाला आहे. सिंधु नदीच्या पाण्याचा प्रश्न चांगलाच पेटला आहे. भारताने पाणी रोखल्याने सिंधमध्ये गृहयुद्ध सदृश्य परिस्थिती आहे. असंतोष इतका भडकला आहे की, आंदोलकांनी सिंधच्या गृहमंत्र्याचं घरच पेटवून दिले आहे. पाकमधील आंदोलक सरकारच्या नियंत्रणाबाहेर गेल्याचे दिसत आहे. या आंदोलनात एक ते दोघांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक जण जखमी झाले आहेत.

पाण्यासाठी हिंसक आंदोलन

पाकड्यांची चोहो बाजूने कोंडी सुरू आहे. एकीकडे सिंधु नदीचे पाणी भारताने अडवले आहे. तर दुसरीकडे सरकारच्या सहा कालवे प्रकल्पाला सिंध प्रांतातील लोकांचा प्रचंड विरोध सुरू आहे. मंगळवारी या आंदोलनाला हिंसक वळण लागले. पाकिस्तानातील सिंध प्रांताचे गृहमंत्री जियाउल हसन लंजर यांचे नौशहरो जिल्ह्यातील घर आंदोलकांनी जाळले. त्यांच्या घराची मोठी नासधूस करण्यात आली. आंदोलकांच्या हाती यावेळी बंदुका होत्या. या बंदुकातून अनेकांनी हवेत गोळीबार केला. गृहमंत्र्याच्या घरातील काही लोकांना मारहाण करण्यात आली. आंदोलकांनी यावेळी शेकडो वाहनं पेटवून दिली.

## पतीच्या खुनाचा कांड कसा उघडा पडला?

यवतमाळ : गत पाच दिवसांपूर्वी चौसाळा टेकडीजवळ अर्धवट जळालेला मृतदेह आढळून आला होता. हा मृतदेह नेमका कुणाचा, याबाबत साशंकता होती. ओळख पटविणे पोलिसांसाठी अत्यंत अवघड होते. तरीदेखील स्थानिक गुन्हेशाखेतील पोलीस पथकाने 'सूता'वरून स्वर्ग गाठत या जळीत हत्याकांडाचा पर्दाफाश केला. या बहुचर्चित हत्याकांडात मुख्य सूत्रधार पत्नी असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असून या संपूर्ण हत्याकांडाला अनैतिकतेची किनार असल्याचे उघड झाले आहे. विशेष म्हणजे कोचिंग क्लासमध्ये येणाऱ्या विधीसंघर्षग्रस्त विद्यार्थ्यांचा 'यूज'करून अत्यंत थंड डोक्याने (कोल्ड मर्डर) जळीत हत्याकांड घडविल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

## श्रीमती वैशाली दामोदर काकडे महाराष्ट्र राज्य महिला आघाडी प्रमुख पदी नियुक्ती जाहीर

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ चे अखिल भारतीय संघटन मंत्री मा श्री महेंद्र कपूर यांच्या मान्यतेने शैक्षिक महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रभारी श्री भिखाभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाने प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे यांनी उत्तम समालोचक जिह्ला परिषद केंद्र शाळा वावंजे तालुका पनवेल जिह्ला रायगड येथील आदर्श शिक्षिका श्रीमती वैशाली दामोदर काकडे यांच्या निवासस्थानी भेट देऊन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या महाराष्ट्र राज्य महिला आघाडी प्रमुख पदी नियुक्ती जाहीर केली आहे या प्रसंगी शिक्षक परिषदेचे प्रांत कार्यवाह पुरुषोत्तम काळे उपस्थित होते.श्रीमती वैशाली काकडे यांना पुढील वाटचालीस मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा देऊन राज्यातील



मातृ शक्तींचे राष्ट्रीय विचारांचे मजबूत असे संघटन उभारून शिक्षक परिषदेच्या संघटन वाढीसाठी योगदान देतील अशी अपेक्षा व्यक्त करत संघटनेच्या कार्यकारिणीने संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. श्रीमती वैशाली काकडे यांच्या निवडीबद्दल राज्यभरामधून त्यांच्यावर अभिनंदन चा वर्षाव होत आहे

# महाराष्ट्राच्या दिशेनं येतय मोठं संकट; उरले फक्त काही तास, ७ जिल्ह्याना रेड अलर्ट

राज्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. महाराष्ट्राला अवकाळी पावसानं चांगलंच झोडपून काढलं आहे. वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह सुरू असलेल्या पावसामुळे मोठं नुकसान झालं आहे, या पावसाचा पिकांना मोठा फटका बसला आहे, तसेच अवकाळी पावसामुळे काही ठिकाणी दुर्घटना देखील घडल्याचं समोर आलं आहे. मुंबईसह, मराठवाडा, विदर्भ अशा सर्वच ठिकाणी सध्या जोरदार पाऊस पडत आहे. त्यातच आता चिंता वाढणारी बातमी समोर आली आहे. पुन्हा एकदा हवामान विभागाकडून मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत हवामान शास्त्रज्ञ जालिंदर साबळे यांनी माहिति दिली आहे. राज्यात मागील काही दिवसांपासून प्री-मान्सून पावसाला सुरुवात झाली आहे. सध्या हा पाऊस वादळी वारा आणि विजांच्या



कडकडाटासह होत आहे. वाऱ्याचा वेग ताशी 50 ते 60 किलोमीटरपर्यंत जाऊ शकतो. काही भागांमध्ये हा पाऊस जोरदार ते अतिजोरदार स्वरूपाचा असण्याची शक्यता आहे. पुढील तीन दिवसांमध्ये दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि पुणे जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, अशी माहिती जालिंदर साबळे यांनी दिली आहे. जालन्याला अवकाळी पावसानं झोडपलं जालना जिल्ह्यातल्या बदनापूर तालुक्यात मागील काही दिवसापासून अवकाळी पावसाचा कहर सुरूच आहे. त्यामुळे फळ पिकांसह इत पिकांचं देखील मोठं नुकसान झालं आहे. शेतकरी संकटात सापडले आहेत. पीर पिंपळगाव, सिंधी पिंपळगाव, तुपेवाडी, बावणे पांगरी यासह आसपासच्या गावांमध्ये काल सायंकाळी आणि मध्यरात्री वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांची दाणादाण उडाल्याचं पहायला मिळालं. विदर्भातही पावसाचा तडाखा दरम्यान विदर्भातही पाऊस सुरूच आहे. गडचिरोली जिल्ह्यात आज जोरदार पावसानं हजेरी लावली अहेरी भामरागड एटापल्ली व सिरोंचामध्ये जोरदार पाऊस झाला आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com